# महाराष्ट्र शासन

## जिल्हाधिकारी (राज्य उत्पादन शुल्क विभाग) यवतमाळ यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| महाराष्ट्र शासन राजपत्र,भाग चार-ब गृह विभाग यांचे आदेश क्र. एमाआयएस.११०८/सीआर-७/ईएक्ससी-३ दिनांक २५ मार्च २००८ नुसार | महाराष्ट्र शासन राजपत्र,भाग चार-ब गृह विभाग यांचे आदेश क्र. एमाआयएस.११०८/सीआर-७/ईएक्ससी-३ दिनांक २५ मार्च २००८ नुसार |
| ग्रामसभेव्दारे मद्यविक्रिची दुकाने बंद करण्यासाठी ठराव घेणे | लेखी निवेदनाव्दारे मद्यविक्रिची दुकाने बंद करण्याची मागणी करणे |
| **ग्रामसभा** | **लेखी निवेदन** |
| गावातील मद्य विक्रिच्या अनुज्ञप्ती बंद करण्याकरिता ग्रामसभेत किमान ५०% एकुण मतदार किंवा एकुण महिला मतदार उपस्थित राहुन साध्या बहुमताने विधिवत ठराव पारित करावयास पाहिजे | जर ग्रामीण भागात २५% पेक्षा कमी नसलेल्या महिला मतदार किंवा एकुण मतदार यांनी अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे लेखी निवेदन देवुन गावातील मद्यविक्रिची अनुज्ञप्ती **बंद** करण्याची मागनी करु शकतील. |
| असा कोणताही ठराव मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ,१९५९ आणि त्याखालील तयार करण्यात आलेल्या नियमातील तरतुदीनुसार विधिवत झालेला असला पाहिजे . | वरील निवेदनातील सह्यांची अधिप्रमाणता व खरेपणाविषयी पडताळणी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी संबंधित तहसिलदार यांना विहित नमुण्यातील मतदान पत्रिकेचा वापर करुन निर्भयपणे व गुप्त पध्दतीने मतदान घेण्याचे निर्देश देतील |
| मतदारांनी त्याच गावाचे रहिवासी असल्याबाबत पडताळणीसाठी ग्रामसभेपुर्वी त्यांचे ओळखपत्र सादर करावे . जे मतदार वरिलप्रमाणे ओळखपत्र सादर करतील त्यांनाच ग्रामसभेत भाग घेता येईल | मतदानाची संपुर्ण प्रक्रिया हि तहसिलदार यांच्या पर्यवेक्षणाखाली अथवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या व नायब तहसिलदारापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका-याच्या पर्यवेक्षणाखाली पुर्ण करतील.मतदानाचे वेळी निरिक्षक दर्जापेक्षा कमी नसलेला अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क यांचा प्रतिनिधी व मद्य अनुज्ञप्तीधारक किंवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित राहतील |
| मतदारांची पडताळणी गटविकास अधिकारी त्या विभागाचे निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क यांचेसह करतील.दोन्ही अधिकारी व संबंधित अनुज्ञप्तीधारकाचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत ग्रामसभा संपन्न होईल. ग्रामसभेच्या प्रत्यक्ष कार्यवाहीची चित्रफीत तयार करण्यात यईल व या चित्रफीतीचा वापर पुरावा म्हणुन उपयोग करण्यात येईल | जर अशा मतदानात स्त्रि मतदारांच्या किंवा एकुण मतदारांच्या ५०% मतदारांनी मद्य अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजुने मत दिल्यास जिल्हाधिकारी अनुज्ञप्ती बंद करण्याची कार्यवाही करण्याकरिता राज्य उत्पादन शुल्क विभागाला आदेश देतील |
| ग्रामसभेने अशारितीने ठराव पारित केल्यानंतर ग्रामसभेच्या ठरावाविरुध्द ग्रामसभेने बंद करण्यात आलेल्या मद्य विक्रिची अनुज्ञप्ती पुन्हा चालु करण्याबाबत ठराव पारित केल्यास ठराव पारित केल्यापासुन १ वर्षापर्यंत अशा ठरावावर विचार करता येणार नाही | |
| ग्रामसभा अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत ठराव पारित करु शकली नाही तर १ वर्षापर्यंत अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत ठराव पारित करु नये | |

# महाराष्ट्र शासन

## जिल्हाधिकारी (राज्य उत्पादन शुल्क विभाग) यवतमाळ यांचे कार्यालय

महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार-ब गृह विभाग यांचे आदेश

क्र. एमाआयएस.११०८/सीआर-७/ईएक्ससी-३ दिनांक २५ मार्च २००८

जर नगर परिषदा / महानगर पालिका क्षेत्रातील एखाद्या वार्डातील २५ टक्केपेक्षा कमी नसलेल्या महिला मतदार किंवा एकुण मतदार यांनी संबंधीत अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे लेखी निवेदन देवुन संबंधीत वार्डातील मद्य विक्रिची अनुज्ञप्ती बंद करण्याची मागणी करतील तेव्हा करवयाची कार्यवाही .

↓

अशाप्रकारे प्राप्त झालेल्या निवेदनावर राज्य उत्पादन शुल्क विभाग सहयांच्या सत्यतेविषयी पडताळणी करतील .

↓

पडताळणी योग्य आढळल्यास, जिल्हाधिकारी संबंधित मुख्याधिकारी/ उपाआयुक्त यांना विहित मतदान पत्रिकेचा वापर करुन निर्भयपणे व गुप्त पध्दतीने मतदान घेण्याचे निर्देश देतील. व त्यानुसार मतदानाची संपुर्ण प्रक्रिया पार पाडतील. मतदानाचे वेळी निरिक्षक दर्जापेक्षा कमी नसलेला अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांचा प्रतिनिधी व मद्य अनुज्ञप्तीधारक किंवा त्याचा प्रतिनिधी उपस्थित राहतील

↓

जर अशा मतदानात स्त्रि मतदारांच्या ५०% पेक्षा अधिक मतदारांची मद्य विक्रिची अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजुने मत दिल्यास जिल्हाधिकारी अनुज्ञप्ती बंद करण्याची कार्यवाही करण्याकरिता राज्य उत्पादन शुल्क विभागाला आदेश देतील

↓

अशा प्रकारे मद्य विक्रिची अनुज्ञप्ती बंद करण्याची कार्यवाही पुर्ण होईल